कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/हिंसंवि/२०२४-२५/१८४
दि. २४/०४/२४

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे दि.२९ एप्रिल २०२४ रोजी "प्रतिभा" या मासिक संगीत सभेचे आयोजन करण्यात आले आहे. कला अकादमीच्या कृष्ण कक्षात दुपारी ठीक ३.०० वाजता मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन होईल. तदनंतर कार्यक्रमाची सुरुवात कु. विजय सावंत व कु. सुरज मळीक यांच्या संवादिनी सहवादनाने होणार आहे. त्यानंतर कु. कौस्तुभ च्यारी, कु. साहिल माजिक व कु. सौरव केरकर यांचे तबला सहवादन होईल. तबला वादनानंतर कु. वरद तारी यांचे शास्त्रीय गायन होणार आहे व त्यानंतर कु. सिध्दी नाईक हीचे बासरी वादन होईल. बासरी वादनानंतर कथ्थक नृत्याचा कार्यक्रम होईल. त्यामध्ये कु. निधी कशाळीकर, कु. आरुणी प्रभु, कु. रिधीमा वेंगुर्लेकर, कु. सानवी धुपकर व कु. कृतिका महाले या विद्यार्थिनीचा सहभाग असेल. तदनंतर भरतनाटयम् नृत्याने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. त्यामध्ये कु. शताक्षी फळगांवकर कु. निधी नाईक-शिरोडकर, कु. शिल्पा. के., कु. मंजिरी फुटणकर, कु. श्रृती खोर्जुवेकर, कु. सोनम कांदे, कु. श्राव्या शेट, कु. आरोही सुभेदार, कु. आभा नाडकर्णी, कु. इच्छा नाईक, कु. गिना पाडगांवकर, कु. सान्वी केंकरे, कु. वर्लिका पिसुर्लेकर व कु. नेहाली किनळकर या विद्यार्थिनी आपली कला सादर करणार आहेत. गायन-वादन सादरीकरणामध्ये सर्व कलाकारांना श्री. सुरज मोरजकर व श्री भार्गवराम गर्दे यांची तबलासाथ तसेच श्री. चारुदत्त गांवस व श्री. शुभम नाईक यांची संवादिनी साथसंगत लाभणार आहे. कथ्थक नृत्यासाठी सौ. वरदा बेडेकर यांची पढंतची साथसंगत लाभणार असून सौ. सम्राज्ञी आईर गायनसाथ करतील. तसेच भरतनाटयम नृत्यासाठी सौ. मंदिरा तिरोडकर या नटवंगमची साथ करणार असून श्री. चेथनमुर्ती.डि.आर मृदंगमची साथसंगत करतील व डॉ. दिप्ता रुबसुंदरम यांची गायन साथसंगत विद्यार्थ्यांना लाभणार आहे.

सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून सर्व संगीत रसिकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे कळविण्यास येत आहे.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)